स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव विद्या शाखा अंतर्गत राज्यशास्त्र विषयातील विद्यावाचस्पती

(पीएच. डी) पदवीसाठी शोध प्रबंधाची रूपरेषा

*** संशोधन अभ्यासाचा विषय ***

"नागरिकांचे सदृढीकरण आणि सेवा हमी कायदा 2015 _एक अभ्यास"

(विशेष संदर्भ हिंगोली जिल्हा)

-: संशोधक :-

सचिनकुमार लक्ष्मणराव मुळे

एम. ए . राज्यशास्त्र (डी.एड, बि. एड.)

राज्यशास्त्र संशोधन केंद्र, पीपल्स कॉलेज, नांदेड

-:मार्गदर्शक :-

प्रा. डॉ. एस. बी. गायकवाड

सहाय्यक प्राध्यापक तथा राज्यशास्त्र विभाग प्रमुख ,

श्री. योगानंद स्वामी कला महाविद्यालय , वसमत

सप्टेंबर २०२२

"नागरिकांचे सदृढीकरण आणि सेवा हमी कायदा 2015 _एक अभ्यास"

(विशेष संदर्भ हिंगोली जिल्हा)

<u>प्रस्तावना:-</u>

भारत हा लोकशाही प्रधान देश आहे. भारताची राज्यघटना ही जगात सर्वात मोठी लिखित व परिदृढ अशी राज्यघटना आहे. या राज्यघटनेच्या आधारेच संपूर्ण भारत देशाचा राज्यकारभार चालतो. यामध्ये देशाचे शासन व प्रशासन अशी दोन भागात विभागणी करून कामे केली जातात. शासनाकडून विविध योजना, कार्यक्रम, धोरण, निर्णय, घेण्यात येतात, तर प्रत्यक्ष अंमलबजावणी ही प्रशासनाकडून करण्यात येते. शासनातील व्यक्ती ह्या देशातील १८ वर्षांपुढील सुज्ञ नागरिकांच्या मतदानाच्या अधिकाराणे निवडून आलेले लोकप्रतिनिधी असतात, तर प्रशासनात उच्च शिक्षण घेऊन अभ्यास करून केंद्रीय लोकसेवा आयोग, महाराष्ट्र लोकसेवा आयोग व सरळ सेवा भरती इत्यादी. स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून यशस्वी झालेले अधिकारी, कर्मचारी काम पहात असतात. प्रशासकीय काम करीत असताना कर्मचार्यानकडून कामे हि काही प्रमाणात दिरंगाईने तर काही अत्यंत तातडीने होताना आपणास पहावयास मिळते. परंतु शासकीय कार्यालयात सर्वसामान्य नागरिकांची कामे तातडीने करण्यास वाव दिला जातो असे दिसून येत नाही. परिणामी त्यांच्या कामकाजात दिरंगाई होताना दिसून येते.

“शासनाने माहिती अधिकार कायदा- २००५” आणि **“दप्तर दिरंगाई कायदा- २००६”** पारित केलेला आहे. परंतु त्याची शासकीय कार्यालयात प्रभावी

अंमलबजावणी होताना दिसत नाही. परिणामी "**लोकसेवा हक्क अधिनियम- २०१५**" नुसार सेवा ह्या विहित वेळेतच पूर्ण करून देण्यासाठी प्रशासन कटिबद्ध असल्याचे अधिनियम करून निश्चित केले आहे. सद्यस्थितीत महाराष्ट्र शासनाने राज्य सरकारी अधिकारी, कर्मचाऱ्यांसाठी **29 फेब्रुवारी 2020** पासून राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना ५ दिवसाचा आठवडा हा निर्णय पारित केला आहे. त्याचा परिणाम सरकारी कामकाजावर होण्याची भीती **"तात्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी त्यावेळीच व्यक्त केली होती"** परिणामी याची पुनरावृत्ती होत असल्याचे दिसून येते. या अनुषंगाने सर्वसामान्य नागरिक, प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी यांची जनतेबद्दल असलेली वचनबद्धता पाळून प्रशासनात लोकाभिमुखता, कार्यक्षमता, पारदर्शकता आणि गतिमानता ह्या बाबी चा वापर करून प्रशासनाने कार्य केली तर, यातून प्रशासन व सर्वसामान्य नागरिक यांच्यात सुव्यवस्था निर्माण होण्यास मदत मिळते. **महाराष्ट्र शासनाने सेवा हमी कायदा २०१५** ह्याच बाबी डोळयासमोर ठेऊन केलेला आहे. व सर्वांसाठी सेवेची हमी म्हणून या कायद्याची निर्मिती करून महाराष्ट्र राज्यात अंमलबजावणी चालू करून भारतात ऑनलाईन सेवा देणारे प्रथम क्रमांकाचे राज्य म्हणून स्थान मिळवले आहे.

<u>संशोधन विषयाचे महत्त्व:-</u>

भारतीय राज्यघटनेने भारतात संसदीय लोकशाही शासन व्यवस्थेचा स्वीकार केला आहे. भारतीय राज्यघटनेने सर्वांना समान न्याय व हक्क बहाल केले आहेत. यातून सामान्य नागरिकांना प्रशासकीय सेवांचा लाभ हा विहित वेळेत घेण्यासाठी

अर्ज केल्या पासून कमीत कमी दिवसात लोकसेवा पुरविण्यात याव्यात या उद्देशाने **सेवा हमी कायदा 2015 चे महत्व आहे.** या कायद्याने नियतकाल मर्यादेत नागरिकांना लोकसेवा प्राप्त करण्याचा अधिकार आहे. त्याप्रमाणेच नियत कालमर्यादेत शासकीय अधिकारी, कर्मचारी यांना कामाप्रती बांधिलकी ठेवून लोकसेवा पुरविणे बंधनकारक आहे. असे न झाल्यास यामध्ये पदनिर्देशित अधिकारी यांची तक्रार आणि अपीलही नागरिक करू शकतात. नागरिकांना लोकसेवा देण्यासाठी ह्या कायद्यात माहिती व तंत्रज्ञानाचा वापर करणे आवश्यक आहे. त्यामुळे कामकाजात होणारा विलंब टाळून वेळेत सेवा देण्याची हमी मिळते व प्रशासनात पारदर्शकता, उत्तरदायित्व व प्रती क्रियाशीलता या तीन घटकाच्या माध्यमातून **सुप्रशासनाची** वाटचाल होऊन नागरिक व प्रशासन यांमधील संबंध सुधारण्यासाठी महत्वाचे कार्य केले जाते. नागरिकांमध्ये प्रशासनाविषयी असलेली नैराश्याची भूमिका बदलून आदराची भावना वाढीस लावण्यासाठी प्रशासनाने नागरिकांच्या सेवा कार्यतत्परतेने पुरविणे अत्यंत महत्त्वाचे आहे. आणि याच उद्देशाने सेवा हमी कायदा 2015 ची प्रभावी अंमलबजावणी व यशस्वीता अभ्यासण्याच्या दृष्टीने प्रस्तुत संशोधनाचा अभ्यास करणे महत्त्वाचे आहे.

संशोधनाची उद्दिष्टे:- (Objectives of Research)

१. सेवा हमी कायदा 2015 चा अभ्यास करणे.

२. कार्यालयीन प्रलंबित कामकाजाबाबत उपाययोजना सुचविणे.

३. सेवा हमी कायदा 2015 ने प्रशासकीय सेवा व्यवस्थेत झालेल्या बदलांचा अभ्यास करणे.

४. जनसंपर्क अधिकाऱ्यांची कार्यालयातील भूमिका अभ्यासणे.

५. आपले सरकार सेवा केंद्रांचा अभ्यास करणे.

६. सेवा हमी कायद्यात माहिती व तंत्रज्ञानाचे अवलोकन करणे

संशोधनाची गृहीतके:- (Hypothesis)

१. सेवा हमी कायदा 2015 ची शासकीय कार्यालयात प्रभावी अंमलबजावणी होत नाही.

२. शासकीय कार्यालयातील कामकाज हे बहुतांश प्रलंबित असते.

३. परिपूर्ण कागदपत्रांची पूर्तता करूनही नागरिकास विहित वेळेत लोकसेवा पुरविली जात नाही.

४. जनसंपर्क अधिकाऱ्याची बहुतांश कार्यालयात निवड करण्यात येत नाही.

५. आपले सरकार सेवा केंद्र चालक अर्जदाराकडून (फीस) पावती पेक्षा जास्त रक्कम घेतात.

६. प्रशासकीय कर्मचारी कामाच्या गुणवत्ता वाढीसाठीचे प्रशिक्षण गांभीर्यपूर्वक घेत नाहीत.

<u>तथ्य संकलन:-</u> (Method of Data collection)

तथ्य संकलन हे संशोधनातील महत्त्वाचे व प्राथमिक कार्य आहे. प्रस्तुत संशोधनाची माहिती मिळवण्यासाठी प्राथमिक स्त्रोत आणि दुय्यम स्त्रोतांचा अवलंब करण्यात येणार आहे.

<u>प्राथमिक स्त्रोत:-</u> (Primary Sources)

प्रस्तुत संशोधन कार्यासाठी आवश्यक असणाऱ्या माहितीचे संकलन करण्यासाठी प्राथमिक तथ्य संकलनाच्या माध्यमातून शासकीय कायदे, संविधानिक तरतुदी,शासनाचे परिपत्रके, व तोंडी मुलाखती आणि प्रश्नावलीच्या अनुषंगाने तथ्य संकलन केले जाणार आहे.

<u>दुय्यम स्त्रोत:-</u> (Secondary Sources)

तथ्य संकलनाच्या द्वितीय स्त्रोतांमधील मिळवली जाणारी माहिती ही संशोधन विषयासाठी सूक्ष्म व महत्त्वाची असते दुय्यम स्त्रोतांमध्ये संबंधित विषयावरील महत्त्वपूर्ण ग्रंथ, मासिके, नियतकालिके, प्रकाशित लेख, वर्तमानपत्रे, व इंटरनेट तसेच अधिनियम, शासन निर्णय. इत्यादींच्या माध्यमातून माहिती मिळविली जाणार आहे.

<u>संशोधन विषयाची व्याप्ती व मर्यादा:-</u>

संपूर्ण महाराष्ट्र हे अभ्यासाच्या दृष्टीने अतिव्यापक क्षेत्र असल्यामुळे संबंधित संशोधनात मर्यादित विशेष संदर्भ म्हणून हिंगोली जिल्ह्याची निवड केली आहे. त्यामध्ये स्थानिक स्वराज्य संस्था, नगरपालिका, नगरपरिषद, नगरपंचायत,तहसील

कार्यालय, उपविभागीय अधिकारी कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय इत्यादी. कार्यालयीन दस्तऐवजांशी संबंधित असल्यामुळे कालावधी सण 2015 ते 2024 अशा व्यापक स्वरूपाचा घेण्यात आला आहे. प्रस्तुत संशोधनात प्रतिसादकाकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे प्राप्त निष्कर्षांची नोंद घेऊन आवश्यक त्या शिफारशी करण्यात येणार आहेत. तसेच निष्कर्षा सोबत गृहीतकाची पडताळणी देखील करण्यात येणार आहे.

संशोधन पद्धती:- (Research Methodology)

प्रस्तुत संशोधन मानवविद्या शाखेतील संशोधन पद्धतीवर आधारित आहे. त्याकरिता वर्णनात्मक, विश्लेषणात्मक, मुलाखत व निरीक्षण या संशोधन पद्धतीचा अवलंब केला जाणार आहे.

संशोधनाचा आराखडा

प्रकरण पहिले- प्रस्तावना व संशोधन पद्धती

प्रस्तुत प्रकरणात प्रस्तावना, संशोधन विषयाची निवड, संशोधनाची व्याप्ती व मर्यादा, संशोधन विषयाचे महत्त्व, संशोधनाची उद्दिष्टे, संशोधनाची गृहीतके, तथ्य संकलन पद्धती व संशोधन पद्धती अशा प्रकारे या प्रकरणात अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण दुसरे- हिंगोली जिल्ह्याची पार्श्वभूमी

परभणी जिल्ह्याची विभागणी करून हिंगोली जिल्ह्याची एक मे 1999 रोजी निर्मिती करण्यात आली जिल्ह्याच्या सीमा ह्या वाशिम बुलढाणा यवतमाळ नांदेड आणि परभणी या जिल्ह्यांना लागून आहेत अशा पद्धतीने जिल्ह्यामध्ये औंढा नागनाथ हिंगोली वसमत कळमनुरी व सेनगाव अशा पाच तालुक्यांचा समावेश असून हिंगोली हे जिल्ह्याचे मुख्य ठिकाण आहे केंद्र शासनाच्या पंचायतराज मंत्रालयाने 2006 मध्ये 250 मागासलेले जिल्हे घोषित केले त्यातीलच हा एक मागासलेला जिल्हा म्हणून हिंगोली जिल्ह्याची ओळख आहे. मागास क्षेत्र अनुदान निधी या योजनेअंतर्गत जिल्ह्याला बराच निधी मिळत असतो हिंगोली जिल्ह्याची अर्थव्यवस्था ही प्रामुख्याने शेती या व्यवसायावर आधारित आहे येथील 83 टक्के लोक शेती वर आधारित आहेत त्यामध्ये 45% शेती व अडतीस टक्के शेतमजूर अशा प्रकारे हिंगोली जिल्ह्यातील साधारण पार्श्वभूमी आहे.

<u>प्रकरण तिसरे-</u> सेवा हमी कायदा- २०१५

महाराष्ट्र लोकसेवा हमी कायदा २०१५ हा दि. २८ एप्रिल २०१५ रोजी पारित झाला आहे. याच्या माध्यमातून जनतेला जलद सेवा, सेवा आपल्या दारात सहज पोहोच, सोपी शुल्क भरणा, वापरण्यास सोपे,वेळेची बचत अशा स्वरूपाचा असून यामध्ये शासकीय कार्यालयातील सेवा सुविधा व विहित वेळेत उपलब्धता याविषयी प्रस्तुत प्रकरणात अभ्यास करण्यात येणार आहे.

<u>प्रकरण चौथे-</u> सेवा हमी कायद्याचा हिंगोली जिल्ह्यातील एक अभ्यास

प्रस्तुत प्रकरणात सेवा हमी कायदा २०१५ चा अभ्यास हा हिंगोली, औंढा (नागनाथ), कळमनुरी, वसमत, सेनगाव ह्या तालुक्यातील व हिंगोली मुख्यालय येथील अनेक कार्यालयातील कामकाज व सोई सुविधांचा अभ्यास करून या कायद्याने नागरिकांच्या कामकाजात आलेली सुसत्रता आणि प्रलंबितता यांचा शासकीय कार्यालय निहाय तुलनात्मक दृष्ट्या अभ्यास करण्यात येणार आहे.

<u>प्रकरण पाचवे-</u> निष्कर्ष व शिफारशी

प्रस्तुत प्रकरणात संशोधन संबंधित प्रतिसादकाकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे प्राप्त निष्कर्षाची नोंद घेऊन आवश्यक त्या शिफारशी करण्यात येणार आहेत. निष्कर्षा सोबत गृहीतकाची पडताळणी केली जाणार आहे.

<u>संदर्भ ग्रंथ:-</u>

१. भारतीय संविधान

२. माहितीचा अधिकार अधिनियम 2005

३. दप्तर दिरंगाई कायदा 2006

४. महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम- 1979

५. महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम- 1979

६. खोपडे,मराठी प्रकाशन सेवा नियमावली- 2018

७. राजू नंदकर, उपजिल्हाधिकारी (लेख)

८. सुशासन आणि भारतातील पुढाकार (लेख)

९. सनदी सेवीची सक्रियता (लेख)

१०. शासकीय कर्मचारी नियमावली, महाराष्ट्र

११. जगतराव सोनवणे, सोना दीपा पब्लिशर्स, कर्मचारी मार्गदर्शक

१२. भारतीय राज्यव्यवस्था, उनिक अकॅडमी

१३. https://aaplesarkar.mahaonline.gov.in/en

-: संशोधक :-

सचिनकुमार लक्ष्मणराव मुळे

एम. ए . राज्यशास्त्र (डी.एड, बि. एड.)

राज्यशास्त्र संशोधन केंद्र, पीपल्स कॉलेज, नांदेड

-:मार्गदर्शक :-

प्रा. डॉ. एस. बी. गायकवाड

सहाय्यक प्राध्यापक तथा राज्यशास्त्र विभाग प्रमुख

श्री. योगानंद स्वामी कला महाविद्यालय , वसमत